सन २०२६-२७ मध्ये मुख्यमंत्री शाश्वत कृषि सिंचन योजनेंतर्गत "सुक्ष्म सिंचन" या घटकाकरिता रु.१०.०० कोटी व "वैयक्तिक शेततळे" या घटकाकरिता रु.६.०० कोटी असा एकूण रु.१६.०० कोटी इतका निधी वितरीत करणेबाबत...

महाराष्ट्र शासन

कृषि विभाग

शासन निर्णय क्रमांक : मुशाशे-०५२६/प्र.क्र.६१ (ई-१६५७७४९)/१४-अे

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक

मंत्रालय विस्तार, मुंबई- ४०० ०३२

दिनांक : ०४ नोव्हेंबर, २०२६.

संदर्भ :

१. वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०२६/प्र.क्र.४०/अर्थ-३, दिनांक ०९.०४.२०२६.
२. वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०२९/प्र.क्र.४०/अर्थ-३, दिनांक ०७.०५.२०२६.
३. कृषि व पदुम विभाग, शासन निर्णय क्र: मुशाशे ०५२६/प्र.क्र.६१/१४-अे, दिनांक २२.०५.२०२६.
४. संचालक (फलोत्पादन), कृषि आयुक्तालय, पुणे कार्यालयाचे पत्र क्र. कृआ प्रकरण क्र./फलो-४/२०२६-२७/मुशासिं/R-२४४/२०२६, दिनांक २५.०५.२०२६.
५. कृषि व पदुम विभाग, शासन निर्णय क्र: मुशाशे ०५२६/प्र.क्र.६१(ई-१६५७७४९)/१४-अे, दिनांक १६.०७.२०२६.
६. आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, पुणे या कार्यालयाचे पत्र क्र. कृआ/मृदसं/मृद-३/ शेततळे/ निधी मागणी/र-६०५/२०२६, दि.०३.०९.२०२६
७. कृषि व पदुम विभाग, शासन निर्णय क्र: मुशाशे ०५२६/प्र.क्र.६१(ई-१६५७७४९)/१४-अे, दिनांक १७.०९.२०२६.

प्रस्तावना :

राज्यातील शेतकऱ्यांना शाश्वत सिंचनाची सोय उपलब्ध करुन देण्याच्या उद्देशाने अवर्षणप्रवण क्षेत्र तसेच आत्महत्याग्रस्त व नक्षलग्रस्त जिल्ह्यात मुख्यमंत्री शाश्वत कृषि सिंचन योजना राबविण्यास दिनांक १९ ऑगस्ट, २०१९ रोजीच्या शासन निर्णयानुसार मान्यता

देण्यात आली असून सदर योजना राज्यातील उर्वरित तालुक्यांमध्ये देखील राबविण्याचा निर्णय शासनाने दिनांक १८ नोव्हेंबर, २०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये घेतला आहे.

सन २०२६-२७ मधील वित्त विभागामार्फत मंजूर अर्थसंकल्पीय तरतुदीच्या मर्यादेत मुख्यमंत्री शाश्वत कृषि सिंचन योजनेंतर्गत सूक्ष्म सिंचनाच्या पूरक अनुदान घटकाकरिता ₹ २०.०० कोटी तरतूदीच्या कार्यक्रमास संदर्भ क्र.३ येथील दिनांक २२.०५.२०२६ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

तद्नंतर संदर्भ क्र.७ येथील दि.१७.०९.२०२६ अन्वये मुख्यमंत्री शाश्वत कृषी सिंचन योजनेंतर्गत "सुक्ष्मसिंचन" या बाबीसाठी ₹ १४.०० कोटी व "वैयक्तिक शेततळे" या बाबीसाठी ₹ ६.०० कोटी अशी सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

संदर्भ क्र. ५ मध्ये नमूद केलेल्या दि.१६.०७.२०२६ च्या शासन निर्णयान्वये सदर योजनेंतर्गत "सुक्ष्मसिंचन" या घटकासाठी रु.४.०० कोटी इतका निधी वितरीत करण्यात आला आहे.

आता वित्त विभागाने मुख्यमंत्री शाश्वत कृषि सिंचन योजनेंतर्गत "सुक्ष्म सिंचन" या घटकाकरिता रु.१०.०० कोटी (रूपये दहा कोटी फक्त) व "वैयक्तिक शेततळे" या घटकाकरिता रु.६.०० कोटी (रूपये सहा कोटी फक्त) असा एकूण रु.१६.०० कोटी (रूपये सोळा कोटी फक्त) इतका उर्वरित निधी उपलब्ध करुन दिला आहे. सदरचा निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :

१. सन २०२६-२७ या वर्षात मुख्यमंत्री शाश्वत कृषि सिंचन योजनेंतर्गत "सूक्ष्म सिंचन" या घटकाकरिता रु.१०.०० कोटी (रूपये दहा कोटी फक्त) व "वैयक्तिक शेततळे" या घटकाकरिता रु.६.०० कोटी (रुपये सहा कोटी फक्त) असा एकूण रु.१६.०० कोटी (रुपये सोळा कोटी फक्त) इतका निधी आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, पुणे यांना अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीवर वितरीत करण्यात येत आहे.

२. या शासन निर्णयान्वये वितरीत निधी खालील लेखाशिर्षाखाली सन २०२६-२७ च्या मंजूर तरतुदीतून खर्ची टाकावा.

मागणी क्र. डी-३,
२४०१, पिक संवर्धन,
(००)(२२) मुख्यमंत्री शाश्वत कृषि सिंचन योजना (सर्वसाधारण)(कार्यक्रम),
(२४०१ बी०७२)
३३, अर्थसहाय्य

३. या योजनेंतर्गत लाभार्थ्यांची निवड व अनुदान मंजुरीची कार्यवाही महा-डीबीटी प्रणालीद्वारे करावी आणि लाभार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यावर अनुदानाची रक्कम सार्वजनिक वित्तीय व्यवस्थापन प्रणालीव्दारे जमा करावी.

४. या शासन निर्णयान्वये वितरीत निधी कोषागारातून आहरित करण्याकरिता आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, पुणे यांना नियंत्रण अधिकारी आणि सहाय्यक संचालक (लेखा-१), कृषि आयुक्तालय, पुणे यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

५. मुख्यमंत्री शाश्वत कृषि सिंचन योजनेची अंमलबजावणी करताना प्रचलित मार्गदर्शक सूचनांचे तसेच अटी व शर्तींचे पालन करावे.

६. प्रधानमंत्री राष्ट्रीय कृषि विकास योजना - प्रति थेंब अधिक पीक (सूक्ष्म सिंचन) या योजनेच्या प्रत्यक्ष दायित्वानुसारच निधी आहरित करण्यात यावा. तसेच, निधी बँक खात्यामध्ये अखर्चित पडून राहणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

७. या शासननिर्णयान्वये वितरीत निधी सन २०२६-२७ या आर्थिक वर्षामध्ये खर्ची टाकण्यात यावा. माहे मार्च, २०२७ अखेर निधी अखर्चित राहिल्यास तो शासनास तात्काळ समर्पित करण्यात यावा. तसेच शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या अटी व शर्तींचे पालन होईल, याची सर्वतोपरी दक्षता घेण्यात यावी.

८. या शासन निर्णयान्वये वितरीत निधीच्या खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र प्रधान महालेखापाल कार्यालयास पाठवून त्याची प्रत राज्य शासनास सादर करावी.

९. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०२६/प्र.क्र.४०/अर्थ-३, दिनांक ०९.०४.२०२६ आणि दिनांक ०७.०५.२०२६ अन्वये विभागास प्रदान केलेल्या अधिकारानुसार, वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. अनौसं.-४२३/२०२६/व्यय-१, दिनांक २४.१०.२०२६ नुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६११०४१५५२३०४९४६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

GANPAT SANDIPAN KACHARE

Digitally signed by GANPAT SANDIPAN KACHARE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Agri and Adf dept, 2.5.4.20=3021BF955FEFD71FFAD5DD7C97769147F19ACA6383A12FED6CFF4849D78E224A, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=B5B30AEBA818C77E43E7B8BA4BCA0E9F0D137FEAB0BBCB16CACF2D44087E8A76, cn=GANPAT SANDIPAN KACHARE
Date: 2026.11.04 15:53:41 +05'30'

(ग.सं. कचरे)

उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति:

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, लोकभवन, मलबार हिल, मुंबई.

२. मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.

३. मा. उपमुख्यमंत्री (नगरविकास, गृहनिर्माण, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम)), महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.

४. मा. उपमुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क, क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्याक विकास आणि औकाफ विभाग), महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.

५. मा. मंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

६. मा. राज्यमंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

७. मा. विरोधी पक्षनेता विधानसभा/ विधान परिषद, विधान भवन, मुंबई.

८. सर्व मा. संसद सदस्य/महाराष्ट्र विधानसभा सदस्य /महाराष्ट्र विधानपरिषद सदस्य

९. मा. मुख्य सचिव यांचे स्वीय सहायक, महाराष्ट्र राज्य.

१०. अपर मुख्य सचिव (वित्त) यांचे स्वीय सहायक, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.

११. प्रधान सचिव (इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विभाग) यांचे स्वीय सहायक मंत्रालय, मुंबई.

१२. सचिव (कृषि) यांचे स्वीय सहायक, कृषि विभाग, मंत्रालय, मुंबई.

१३. आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे.

१४. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ, एपीजे हाऊस, मुंबई.

१५. राज्य सूचना अधिकारी, राज्य सूचना विज्ञान केंद्र, नवीन प्रशासकीय इमारत, मुंबई.

१६. संचालक, माहिती तंत्रज्ञान, मंत्रालय, मुंबई.

१७. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई.

१८. महालेखापाल महाराष्ट्र (लेखा व अनुज्ञेयता) मुंबई/नागपूर.

१९. महालेखापाल महाराष्ट्र (लेखा परिक्षा) मुंबई/नागपूर.

२०. वित्त विभाग (व्यय- १/अर्थसंकल्प १३), मंत्रालय, मुंबई.

२१. सर्व उप सचिव / अवर सचिव / कक्ष अधिकारी, कृषि विभाग, मंत्रालय, मुंबई.

२२. सर्व संचालक, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.

२३. निवडनस्ती (१४-अे कार्यासन) कृषि विभाग, मंत्रालय, मुंबई.